ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें; बुधवार तारीख ७ आक्टोबर, १९५३ अंक ४०

## विविध माहिती

**महात्माजींची आठवण**—१९३१ सालीं भरविण्यांत आलेल्या गोलमेज परिषदेला महात्मा गांधी गेले असतांना ते ज्या इमारतींत रहात होते तीवर तशी आठवण करून देणारा भित्तीफलक लावण्याचा निर्णय लंडन कौंटी कौन्सिलनें घेतला असल्याचें समजतें. त्यावेळीं महात्माजी लंडनमधील किंग्स्ले हॉल ह्या ठिकाणीं रहात होते.

**गांव–सभांना उत्तेजन**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्यांतील गांवसभांच्या विधायक कार्याला उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटपाशीं ६०० रुपयांची रकम देऊन ठेवण्यांत आली आहे. आपआपल्या जिल्ह्यांत उत्कृष्ट काम करणाऱ्या गांवसभांना ह्या रकमेंतून बक्षिसें देण्यांत यावयाचीं आहेत.

**बेकारी निवारणाची योजना**—आसामचें सरकार ग्रामीण भागांतील बेकारी नाहींशीं करण्याची एक योजना तयार करीत आहे. १०० कुटुंबांनीं मिळून एक आदर्श खेडें बसविण्याची व्यवस्था करण्यांत येईल. प्रत्येक कुटुंबाला शेतीसाठी २५ बिघे आणि रहाण्यासाठी ४ बिघे जागा देण्यांत येणार आहे. प्रत्येक कुटुंबानें १० ते २० नारळीचीं झाडें लावलीं पाहिजेत अशी अट घालण्यांत येणार आहे. घरें सरकार बांधून देणार आहे.

**वाहतुकीच्या अडथळयामुळें निष्कारण खर्च**—न्यूयॉर्क शहरांत वाहतुकींतील अडथळयामुळें दरवर्षी १,०८,२२,००,००० डॉलर्सची रकम निष्कारण खर्च होते. पेट्रोल, लॉरी ड्रायव्हर्सचा पगार, मोटार–गाड्यांची खराबी, इत्यादि १५ बाबी वाया गेलेल्या खर्चांच्या म्हणून सांगण्यांत येतात.

**क्षयरोगासाठी तपासणी**—उत्तर प्रदेशांत सप्टेंबर, १९४९ पासून क्षयरोगाची तपासणी करण्यासाठी मुलांना बी. सी. जी. लस टोंचण्याची मोहीम चालू करण्यांत आली होती. ऑगस्ट १९५२ अखेर २१,७०,००० मुलांना लस टोंचण्यांत आली.

**रेडिओ टेलिफोनचें दळणवळण**—इराणच्या आखाता-नजीकचे देश, मलाया आणि ऑस्ट्रेलिआ ह्या देशांशीं भारताचें रेडिओ टेलिफोनच्या साह्यानें लवकरच दळणवळण सुरू होणार आहे असें समजतें. ह्यासंबंधीं जरूर ते प्रयोग सध्यां चालू आहेत. सध्यां भारताचें इंग्लंड, इजिप्त, जपान, इंडोनेशिआ व पूर्व आफ्रिका ह्या देशांशीं असें दळणवळण आहे.

**दिल्लीमध्यें खुलें थिएटर**—नाट्य आणि इतर सांस्कृतिक करमणुकीचीं साधनें गरिबांनासुद्धां उपलब्ध करण्यासाठी इंडिअन नॅशनल थिएटर ही संस्था दिल्ली येथें एक मैदानी नाट्यगृह बांधण्याचा विचार करीत आहे. तिकिटांचा दर फक्त चार आणे ठेवण्यांत येणार असल्याचें समजतें.

**सावंतवाडीजवळ सिलिका**—सावंतवाडीजवळील वालावल ह्या गांवाच्या ५–६ मैलांच्या टापूंत सिलिकाच्या खाणी सांपडल्याची वार्ता आहे. ह्या खाणी चालू केल्या तर ५०० मजुरांना बरींच वर्षें रोजगार मिळेल असा अंदाज करण्यांत आला आहे. खाणी चालू करण्यासाठी कांहीं सहकारी संस्थांनीं आणि खाजगी व्यक्तींनीं सरकारकडे परवानगी मागितली आहे.

**मास्कोमधील शेतीचें प्रदर्शन**—मास्को येथें येत्या उन्हाळ्यांत शेतीविषयीचें एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शन पहाण्यासाठी भारतामधील शेतकऱ्यांचें एक प्रतिनिधी-मंडळ पाठवावें अशी विनंति रशिआचे भारतामधील माजी वकील मि. बेनेडिक्टॉव्ह ह्यांनीं भारतीय सरकारला केली आहे. प्रदर्शनांत इतक्या वस्तू ठेवण्यांत येणार आहेत कीं, प्रत्येक वस्तूपुढें एक मिनिट थांबलें तरी सर्व प्रदर्शन पहाण्यास ३ वर्षें लागतील.

**खेड्यांतील लोकांसाठी वैद्यकीय मदत**—उत्तर प्रदेश सरकारनें खेडेगांवांतील लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी तज्ज्ञ होमिओपाथिक डॉक्टरांना मदत देण्याचें ठरविलें आहे. अशा डॉक्टरांना दरमहा ५० रुपये पगार आणि इतर खर्चासाठी वार्षिक ८०० रुपये देण्यांत येणार आहेत. त्याशिवाय पहिल्या वर्षी फर्निचर वगैरेसाठी २०० रुपये देण्यांत येतील.

**बेकारी टाळण्यासाठी प्रयत्न**—बेकारी कमी करण्यासाठी काड्याच्या पेट्यांच्या छोट्या कारखान्यांना उत्तेजन देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे, असें समजतें. चालू छोट्या उद्योगधंद्यांना मदत देण्यांत येणार असून नवीन कारखान्यांना आर्थिक साह्य देण्यांत येईल. तंत्रज्ञ शिकवून तयार करण्यासाठी कलकत्ता येथें एक आणि दक्षिण भारतांत एक अशीं दोन केंद्रें काढण्यांत येणार आहेत.

**मुंबई राज्यांतील मँगेनीझच्या खाणी**—मुंबई राज्यांत उत्तर कानडा जिल्ह्यांतील दाट जंगलाच्या भागांत मँगेनीझच्या खाणी सांपडल्याची वार्ता आहे. सुमारें ५ लाख टन मँगेनीझ येथून मिळूं शकेल, असा अंदाज आहे. मँगेनीझच्या मातींचे थर १०–१२ फूट खोलीवरच असून मुंबई राज्यांतील रासायनिक धंद्यांना तिचा उपयोग होण्यासारखा आहे.

**वनौषधींचें संरक्षण**—कूर्गमध्यें 'गरुड-पाताळ' नांवाची एक वनौषधि सांपडते. ही वनस्पति औषधें तयार करण्यास फार उपयोगी असल्यानें राज्याबाहेर तिची बरीच निर्यात होत असते. अशीच अनियंत्रित निर्यात होत राहिल्यास लवकरच ती नामशेष होण्याचा संभव असल्यानें सरकारनें तिच्या कोणत्याहि स्वरूपाच्या निर्यातीस बंदी केली आहे.

## आयुर्विमा कंपन्यांच्या मूल्यमापनांची छाननी

### वाढता वाढावा, वाढती नफावाटणी

१९५१ चे अखेरीस बँक रेट ३% चा ३½% करण्यांत आला, तेव्हां त्याचा परिणाम विमा कंपन्यांवर अनिष्ट होईल, अशी भीति व्यक्त करण्यांत आली होती. सरकारी रोख्यांचा बाजारभाव उतरला त्यामुळें जिंदगीच्या बाजूच्या रोख्यांची किंमत उतरवून दाखवावी लागली व बहुतेक कंपन्यांना रोख्यांच्या किंमतीमधील घसाऱ्यासाठी तरतूद करावी लागली. तथापि, एकंदरीनें पहातां, विमा कंपन्यांना अडचण भासली नाहीं. कारण चालू गुंतवणूकीवर त्यांना ज्यास्त व्याज मिळूं लागलें. विमा कंपन्यांच्या मूल्यमापनाचे अहवाल पाहिले, तर कित्येक कंपन्यांची स्थिति सुधारली असल्याचें दिसून येतें. व्याजाचा गृहीत धरलेला दर, १९५१ मधील वाढाव्याची पूर्वीच्या मूल्यमापनांतील वाढाव्याशीं तुलना आणि वाढाव्याचा विनियोग, ह्या तीन दृष्टींनीं पहातां, विमा कंपन्यांनीं चांगली प्रगति केली आहे, असेंच आढळतें.

### १९५१ च्या मूल्यमापनांचा निष्कर्ष

#### (१) व्याजाचा दर

| | | कंपन्यांची संख्या |
|---|---|---|
| पूर्वीच्या मूल्यमापनांत गृहीत धरलेला | | २२ |
| पूर्वीच्या मूल्यमापनापेक्षा ⅛% ज्यास्त | ४ | |
| „ „ ¼% ज्यास्त | ९ | १८ |
| „ „ ½% ज्यास्त | ५ | |
| पूर्वीच्या मूल्यमापनापेक्षा कमी | | ४ |
| | | ४४ |

#### (२) वाढावा

| | | कंपन्यांची संख्या |
|---|---|---|
| पूर्वीच्या मूल्यमापनापेक्षा ज्यास्त वाढावा | २९ | |
| „ „ कमी तोटा | ५ | ३९ |
| पूर्वीचें मूल्यमापन तोट्याचें, आतां वाढाव्याचें | ५ | |
| पूर्वीच्या मूल्यमापनापेक्षा कमी वाढावा | | ५ |
| | | ४४ |

#### (३) वाढाव्याचा विनियोग

| | | कंपन्यांची संख्या |
|---|---|---|
| पूर्वीच्या मूल्यमापनापेक्षा जास्त दरानें बोनस दिला | १२ | |
| पूर्वीच्या मूल्यमापनांत बोनस नव्हता, आतां दिला | ११ | २८ |
| पूर्वीच्या मूल्यमापनांत तोटा, १९५१ चें मूल्यमापन वाढाव्याचें, बोनस दिला नाहीं | ५ | |
| पूर्वीच्या मूल्यमापनाप्रमाणेंच बोनस दिला | ३ | |
| दोन्हीं मूल्यमापनें वाढाव्याचीं, बोनस दिला नाहीं | ५ | १३ |
| दोन्हीं मूल्यमापनें तोट्याचीं. | ५ | |
| पूर्वीच्या मूल्यमापनापेक्षा कमी दरानें बोनस दिला | २ | |
| पूर्वीच्या मूल्यमापनांत बोनस दिला, १९५१ च्या मूल्यमापनांत वाढावा, पण बोनस नाहीं | १ | ३ |
| | | ४४ |

थोडक्यांत म्हणजे, ४४ पैकीं १८ कंपन्या पूर्वीपेक्षा मोठ्या व्याजाच्या दरानें मूल्यमापन करूं शकल्या, ४४ पैकीं २९ कंपन्या पूर्वीपेक्षा ज्यास्त वाढावा मूल्यमापनांत दाखवूं शकल्या आणि ५ कंपन्यांना तोटा उतरला. ४४ पैकीं १२ कंपन्या ज्यास्त दरानें बोनस देऊं शकल्या व ११ कंपन्यांनीं पूर्वी स्थगित केलेले बोनस पुनः सुरू केले.


# कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले

**श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ"**

ह्यांचे कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील

**— विविध लेख —**

जीवन सुखी होण्यासाठी आवश्यक अशा आचार-विचारांचें अगदीं सोप्या भाषेंत केलेलें विवेचन.

काहीं विषय

★ सौंदर्य नसलें तरी चालेल.
★ ह्या सुखास श्रीमंतीची आवश्यकता नाहीं.
★ उपयुक्त तेंच शिक्षण द्या.
★ जरा जपूनच बोला.
★ पाहुणचाराचें व्यावहारिक अर्थशास्त्र.
★ सुमतीबाईच का हव्यात ?
★ मिळतें घ्या आणि शहाणे व्हा.

इत्यादि सुमारें ३५ लेख.

पृष्ठसंख्या सुमारें १६० } विजयादशमीस प्रसिद्ध होईल. } किंमत १ रु. ८ आ.

पत्ता:—" अर्थ " पुणें ४.



# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घेंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस्. जोशी, अ. मॅनेजर. } एन्. व्ही. पांडव, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ७ आक्टोबर १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे.
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मागासलेल्या देशांच्या उद्धारासाठी शिक्षणाच्या प्रसाराची आवश्यकता

### “ युनेस्को ” अहवालाचा मथितार्थ

जगांतील निम्म्या स्त्री–पुरुषांना लिहितां वाचतां येत नाहीं. कांहीं देशांतील लोकसंख्येची वाढ नव्या शालागृहांच्यापेक्षा अधिक वेगानें होत असल्यानें, निरक्षरांची संख्या वाढतच आहे. रशिआ वगळून बाकीचा आशिया, लॅटिन अमेरिका, पॅसिफिक बेटें, इत्यादींचा बहुतेक भाग आणि जवळजवळ सबंद आफ्रिका ह्यांतील शिक्षणाची परिस्थिति अत्यंत असमाधानकारक आहे. आर्थिक प्रगतीचा अभाव, अपुरें उत्पादन व त्यामुळें निर्माण झालेलें दारिद्र्य, ह्या कारणांमुळें शिक्षणावर फार खर्च करणें तेथें परवडतच नाहीं. त्यांतच रोगराईची भर पडते. कोट्यावधि लोक अशा अत्यंत कनिष्ठ परिस्थितींत जीवन कंठीत असल्यामुळें, तेथें असंतोष निर्माण होणें अपरिहार्य आहे. मागासलेल्या देशांच्या, ह्या अगदीं कमी दर्जाच्या उत्पादनशक्तीमुळें प्रगत राष्ट्रांना हवा असलेला कच्चा माल मिळत नाहीं व त्यांचा पक्का मालहि खपत नाहीं. अशा रीतीनें हा मागासलेपणा सर्वांनाच अनुपकारक ठरतो. युनेस्कोचा शैक्षणिक कार्यक्रम ह्या परिस्थितीवरच आधारलेला आहे.

मागासलेल्या देशांतील मुलामुलींना शिक्षण मिळालें नाहीं, म्हणजे पुढें त्यांचेच निरक्षर स्त्री–पुरुष तयार होणार हें उघड आहे. सक्तीच्या शिक्षणाची योजना करावयाची म्हणजे पैसा हवा; अर्थात, त्यासाठीं कर देऊं शकेल अशी संपत्ति किंवा उत्पन्न ह्यांची जरूरी आहे. पण निरक्षरांचा भरणा असलेल्या देशांत उत्पादनहि अपुरें होतें व लोकांचा राहणीचा दर्जा कनिष्ठ रहातो. त्यांत कर देण्यास कूसच उरत नाहीं. शाळा चालविणें व शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या किमान गरजा भागविणें हें त्या देशांच्या आवांक्याबाहेरचें असतें. जननाचें मोठें प्रमाण, आयुर्मर्यादा लहान आणि काम करणाजोग्या तरुणांची संख्या तौलनिक दृष्ट्या कमी, अशा परिस्थितीमुळें अविकसित देशांच्या उद्धाराचा प्रश्न अधिकच बिकट होतो. भारत, सिरिया, इत्यादि देशांच्या सरकारांना ह्याची जाणीव आहे. कांहीं देश एका पिढीचे अवधींतच सार्वत्रिक शिक्षणाची योजना अंमलांत आणूं इच्छितात. मोफत आणि सक्तीचें शिक्षण ह्यांमुळेंच केवळ सर्व प्रश्न सुटतील असें नाहीं. परंतु मागासलेल्या देशांच्या प्रगतीस फार मोठा हातभार त्यामुळें लागूं शकेल, हें उघड आहे. लोकांना अधिकाधिक शैक्षणिक सोई हव्या आहेत आणि ती गरज भागविण्याचा प्रयत्न हीं सरकारें त्यांच्या तुटपुंज्या आर्थिक सामर्थ्यास अनुसरून करीत आहेत. परंतु लोकसंख्येच्या वाढीच्या मानानें हे प्रयत्न फारच अपुरे पडत आहेत.

---

**ग्रामीण विद्यापीठाला मदत**—सरदारशहर येथील महात्मा गांधी ग्रामीण विद्यापीठाला भारतीय सरकारनें १०,००० रुपयांची मदत चालू सालासाठी मंजूर केली आहे.

## चित्तरंजन कारखान्याच्या विस्ताराची योजना

चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री. मुकर्जी ह्यांनीं कलकत्ता येथें रोटरी क्लबांत भाषण करतांना कारखान्याच्या संबंधीं बरीच माहिती सांगितली. श्री. मुकर्जी म्हणाले कीं, १९५१ च्या ऑगस्ट महिन्यांत कारखान्यांतून पहिलें एंजिन बाहेर पडलें. ह्या एंजिनांतील ५० टक्के भाग कारखान्यांतच तयार झालेले होते. अगदीं प्रारंभीं कारखान्यांत परदेशाहून आयात केलेल्या भागांची जोडणीच फक्त करण्यांत येत असे. त्यावेळीं कारखान्यांत तयार होणारे भाग फारच थोडे होते. तथापि हळूहळू अधिकाधिक भाग कारखान्यांत तयार होऊं लागले. कामगार जसजसे अधिक माहितगार होतील तसतसे आयात करावयास लागणाऱ्या भागांचें प्रमाण कमी होत जाईल. एंजिनाला लागणारें सर्वच सामान कारखान्यांत तयार करणें शक्य होणार नाहीं आणि तें इष्टहि नाहीं. तरीपण जरूर पडली तर एकूण एक साहित्य, परदेशीय आयातीवर अवलंबून न रहातां, तयार करतां येईल अशी तयारी कारखान्यांत करण्यांत येत आहे. चित्तरंजन कारखान्यांत तयार होणाऱ्या रेल्वे एंजिनाला ६·५ कोटी रुपये खर्च येतो. तेंच आयतें एंजिन आयात केलें तर ५·३ कोटी रुपये पडतात. आयत्या एंजिनावर ५ टक्के जकात घेण्यांत येते. ह्या धंद्याला ३० टक्के इतक्या संरक्षण जकातीची जर मदत मिळाली तर भारतीय रेल्वे एंजिनें परदेशी एंजिनांपेक्षा स्वस्त पडतील. हा धंदा अजून बाल्यावस्थेंतच आहे. सरकारनें चित्तरंजन कारखान्याला बऱ्याच सवलती दिलेल्या आहेत आणि सरकारची अशी अपेक्षा आहे कीं, थोड्याच वर्षांत चित्तरंजन कारखान्यांतून परदेशाच्या तोडीचीं एंजिनें त्यांच्या इतक्याच किंमतींत तयार व्हावींत.

सध्यां चित्तरंजन कारखान्यांकडून एंजिनें विकत घेणाऱ्या गिऱ्हाइकांना तीं परदेशीय एंजिनांच्या किंमतीलाच देण्यांत येतात. कारखान्यांत तयार होणाऱ्या एंजिनांची किंमत परदेशी एंजिनांच्या किंमतीपेक्षा जेव्हां कमी होईल तेव्हां किंमतीमधील ही तफावत गिऱ्हाइकांनीं द्यावयाची आहे. तोंपर्यंत तफावतीची रक्कम कर्ज म्हणून मानण्यांत यावयाची आहे. चित्तरंजन कारखान्याची रचना दरवर्षी १२० नेहमींच्या आकाराचीं रेल्वे एंजिनें बांधण्याच्या हेतूनें करण्यांत आली होती. तथापि, सध्यां भारतीय रेल्वेवर जीं सर्वांत मोठीं एंजिनें वापरण्यांत येतात, त्या आकाराचीं एंजिनें तयार करावयाचीं झाल्यास तीं दरवर्षी ९६ च होतील. हल्लीं दर महिन्याला ५ रेल्वे एंजिनें तयार होतात; लवकरच ६ होऊं लागतील अशी आशा आहे. वाकबगार कामगार शिकवून तयार करण्यासाठीं १९५१ सालीं कारखान्याला जोडूनच एक तांत्रिक शाळा काढण्यांत आली. ह्या शाळेंत ३०० विद्यार्थ्यांची रहाण्याचीसुद्धां सोय करण्यांत आली आहे. शाळेंतील उमेदवारांना साधारणपणें यंत्रकलेचें ज्ञान देण्यांत येतें. परंतु कारखान्यांतील सुपरवायझरच्या जागेपर्यंत अगर वर्क्समॅनेजरच्या जागेपर्यंत चढण्याइतकी कुशलता संपादन करण्याची संधीहि

त्यांना देण्यांत येतें. कारखान्यांतील कामगारवर्गासाठी रात्रीचे वर्ग काढण्यांत आले आहेत. त्या ठिकाणीं कामगारांना अधिक कौशल्याचें अगर अधिक पगार मिळणारें काम शिकतां येतें. भारतांत कामगारांना अशी संधि देण्याचा हा पहिलाच उपक्रम आहे.

## वैमानिक वहातुकीची प्रगति

गेल्या पंधरा वर्षांत; विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर, वैमानिक वहातुकीच्या बाबतींत जगांत फार मोठी प्रगति करण्यांत आली आहे. कोरिआंत गेलेल्या भारतीय सैन्याला युद्ध–कैद्यांवर देखरेख ठेवण्यासाठी ६०० सैनिकांची तांतडीनें गरज लागली. हे सैनिक कोरिआला नेण्यासाठी अमेरिकेचीं ग्लोब मास्टर ह्या प्रकारचीं विमानें कलकत्त्यास आलीं होतीं. विमानें विमानतळावर उतरल्यावर इतर जातीचीं डकोटा व कॉन्स्टेलेशन्स विमानें त्यांच्यापुढें अगदींच किरकोळ दिसूं लागलीं. डकोटा विमानांच्या पंखापेक्षा ग्लोब मास्टरचे पंख दुप्पट लांब असतात आणि त्यांची उंची तिप्पट असते. वजन नेण्याच्या दृष्टीनें पाहिलें तर ग्लोब मास्टर विमान आज जगांत पहिल्या क्रमांकाचें लागेल. कलकत्ता शहरांत धांवणाऱ्या दोन बसेसना हें विमान नेऊं शकतें; किंवा २॥ टन वजनाच्या तीन लॉरी अगर १४ जीप गाड्या तें आपल्या पोटांत घेऊं शकेल. कांहीं दिवसांपूर्वी एका उत्तर कोरिअन वैमानिकानें मिग जातीचें रशिअन लढाऊ विमान साऊलच्या विमानतळावर उतरविलें. हें लढाऊ विमान अमेरिकेला पाठविण्यासाठीं ग्लोब मास्टरचाच उपयोग करण्यांत आला.

ग्लोब मास्टर विमानाला सामान्यतः तीन मजले असतात. सर्वांत खालच्या मजल्यांत विमानाची अनेक प्रकारची यंत्रसामुग्री असते. ह्या मजल्यावरून बोगदे काढण्यांत आलेले असतात. त्यांतून पंख्यांवर जाऊन विमान चालूं असतांनाच किरकोळ दुरुस्ती करतां येते. दुसऱ्या दोन मजल्यांतून २५ टन वजन, अगर २०० शस्त्र सैनिक अगर १३६ रुग्णाईत नेता येतात. मोठालीं अवजड यंत्रें उचलून घेण्यासाठी विमानाच्या पोटांत एक लिफ्ट बसविण्यांत आला आहे. तो जमिनीशीं समांतर पुढें मागें करतां येते. वैमानिकांच्या बसण्याच्या जागीं अनेक प्रकारच्या यांत्रिक युक्त्यांची गर्दी झालेली असते. ह्या जागेच्या मागेंच वैमानिकांना झोपण्यासाठी एक छोटीशी खोली असते. विमानाला प्रत्येकीं ३,५०० अश्वशक्तींचीं ४ एंजिनें असतात. त्याची प्रवासाची गती ताशीं २५० मैल असते, आणि संपूर्ण वजन घेऊन तें २,००० मैल न थांबतां प्रवास करूं शकतें. प्रत्येक विमानाची किंमत २० लाख डॉलर्स असते.

## श्री. वा. पुं. वर्दे, महाराष्ट्र बँकेचे चेअरमन

श्री. वा. पुं. वर्दे ह्यांना बँक ऑफ महाराष्ट्र लि. च्या डायरेक्टरबोर्डावर घेण्यांत आलें असून त्यांची बोर्डाचे चेअरमन म्हणूनहि निवड झाली आहे, असें समजतें. पूर्वीचे चेअरमन श्री. चिं. कृ. साठे हे साधे डायरेक्टर म्हणून राहिले आहेत. व्हाइस चेअरमनच्या जागीं श्री. श्री. गो. मराठे हे कायम आहेत. श्री. वर्दे हे बँकेच्या स्थापनेपासून बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे डायरेक्टर होते. १९४८ सालीं त्यांची रिझर्व्ह बँकेच्या लोकलबोर्डावर नेमणूक झाली, म्हणून त्यांस बँकेच्या बोर्डाचें सभासदत्व सोडावें लागलें. बँकेच्या मार्गदर्शनासाठी ते पुनः परत आले आहेत.

## शास्त्रज्ञांचा दूरदृष्टीचा इशारा

शास्त्रज्ञ किती दूरदृष्टीचे असतीत ह्याचें एक गंमतीदार उदाहरण प्रसिद्ध झालें आहे. एका शास्त्रज्ञानें असा इशारा दिला आहे कीं, नव्या नव्या औद्योगिक शक्तीच्या शोधांत मनुष्य असून तीसाठी समुद्राच्या भरती-ओहोटीचाहि उपयोग करण्याचा त्याचा प्रयत्न चालू आहे. पण भरती-ओहोटीचा उपयोग शक्तीसाठी प्रमाणाबाहेर केला गेल्यास चंद्र पृथ्वीवर कोसळण्याचा धोका आहे. तथापि, ही आपत्ति ओढविण्यास निदान ३,६०,००,००० वर्षे तरी लागतील असा त्याचा अंदाज आहे. प्रो. हाल्डेन ह्यांनींहि असा इशारा पूर्वी दिला आहे कीं, भरती-ओहोटीपासून वीज निर्माण करण्याच्या प्रयत्नामुळें पृथ्वीच्या भ्रमणाची गति कमी होत जाईल, दिवस मोठे होत जातील आणि चंद्र पृथ्वीच्या जवळ जवळ ओढला जाऊन अखेर पृथ्वीवर आदळेल आणि पृथ्वीचा नाश होईल. लॉर्ड डडले ह्यांचें म्हणणें असें आहे कीं, औद्योगिक शक्तीचा पुरवठा करणारे जे दोन पदार्थ, कोळसा आणि तेल, ह्यांचा पृथ्वीवरील सांठा मर्यादित आहे. अमेरिकेंतील कोळसा २,५०० वर्षांनीं संपेल. ब्रिटनमधील कोळशाच्या खाणी तर आणखी कांहीं शतकांनींच बंद कराव्या लागतील. अलीकडे अणुशक्तीचा उपयोग उद्योगधंद्यासाठी करणें शक्य कोटींत आलें आहे. पण ह्याहि पुरवठा कायमची गरज भागविण्याइतका नाहीं. कारण, जगांतील युरेनिअमचा सांठा मर्यादित असल्यानें दुसरें एखादें मूलभूत द्रव्य शोधून काढलें तरच अणुशक्ति पुरेशी मिळूं शकेल. अर्थात्, भविष्यकाळांत भरती-ओहोटीचा उपयोग करून औद्योगिक शक्ति निर्माण करणें भाग पडेल आणि पृथ्वीच्या कारभारांत चंद्राचा असा हस्तक्षेप झाला कीं पृथ्वीचें मरण ओढवेल!

## आंतरराष्ट्रीय रेशीम परिषद


इटलीमधील मिलन ह्या शहरीं ता. २८ सप्टेंबरपासून ३ ऑक्टोबरपर्यंत इंटर नॅशनल सिल्क काँग्रेस भरली होती. भारताचे प्रतिनिधी म्हणून श्री. डी. एन्. श्रॉफ हे परिषदेला हजर राहिले होते. श्री. श्रॉफ हे मुंबईच्या सिल्क अँड आर्ट सिल्क मिल्स असोसिएशन ह्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. वृत्तपत्र–प्रतिनिधींना दिलेल्या मुलाखतींत श्री. श्रॉफ म्हणाले, कीं सध्यां रेशमाचा धंदा करणाऱ्या देशांपुढें दोन फार महत्त्वाचे प्रश्न उभे आहेत. पहिला प्रश्न रेशमाच्या किंमती स्थिर पायावर आणणें हा आहे आणि दुसरा म्हणजे खऱ्या रेशमाला बनावट रेशमाच्या स्पर्धेपासून संरक्षण देणें. मिलन येथें भरलेली काँग्रेस इंटर नॅशनल सिल्क असोसिएशनतर्फे भरविण्यांत आली होती. ह्या संघटनेचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेत. रेशमाच्या पैदासीला उत्तेजन देणें आणि मदत करणें; जगांत रेशमी कापडाचा खप वाढावा म्हणून प्रचार करणें; रेशमाच्या सुताचें प्रमाण ठरवून त्याप्रमाणें त्यांच्या तपासणीची व्यवस्था करणें; रेशमाच्या सुताची प्रतवारी लावणें आणि रेशमाच्या धंद्याविषयीं आंकडे गोळा करणें व ते ठिकठिकाणीं प्रसिद्ध करणें. रेशमाच्या आंतरराष्ट्रीय किंमती स्थिर करणें आणि कृत्रिम रेशमाचा बनावट रेशमापासून बचाव करणें ह्या दोन्ही प्रश्नांचा विचार १९५१ मध्यें लंडन येथें भरलेल्या परिषदेंत करण्यांत आला होता. त्यावेळीं जपानच्या सूचनेप्रमाणें १३२ पौंड वजनाच्या रेशमाच्या गासडीची किंमत १८० पौंड ठरविण्यांत आली होती, अशी माहिती श्री. श्रॉफ ह्यांनीं सांगितली. मिलन येथें भरणाऱ्या परिषदेंत वरील दोन्ही प्रश्नांचा पुन्हां नव्यानें विचार होणार आहे असें दिसतें. अर्थात् मागें ठरविण्यांत आलेली किंमत स्थिर कां राहूं शकली नाहीं ह्याचाहि विचार होईलच.

## मोठ्या लोकांच्या स्वाक्षऱ्यांचा बाजार

लंडनमध्यें मोठ्या लोकांच्या स्वाक्षऱ्या मिळविणाऱ्या लोकांची संख्या बरीच आहे. स्वाक्षऱ्यांचा हा एकप्रकारचा बाजारच आहे म्हटलें तरी चालेल. ह्या बाजारांत महात्मा गांधींच्या स्वाक्षरीची किंमत १५ पौंड आहे. महात्माजींच्या सहीप्रमाणेंच मार्शल टिटो, रशिअन परराष्ट्रमंत्री एम्. मोलोटोव्ह, आणि ड्यूक ऑफ् विंडसर ह्यांच्या स्वाक्षऱ्यांची किंमतहि १५ पौंड आहे. सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ अलबर्ट आइनस्टाईन ह्यांच्या स्वाक्षरीची किंमत ४ पौंड आहे. सगळ्यांत अधिक किंमत ब्रिटनच्या राणीच्या स्वाक्षरीची आहे. ह्या स्वाक्षरीसाठी २८ पौंड द्यावे लागतात. ह्या बाजाराचे सुद्धां दोन प्रकार आहेत. मोठ्या व्यक्तींच्या पत्रावरील सह्यांचे लिलांव करणारे कांहीं दुकानदार आहेत. ह्या लिलांवामधून बोलणाऱ्यांना अर्थातच रोख पैसे मोजून स्वाक्षऱ्या मिळवाव्या लागतात. शाळकरी मुलें पुष्कळ मोठ्या लोकांच्या स्वाक्षऱ्या मिळवितात. पण त्यांच्या बाजारांत व्यवहार रोखीचा नसतो; स्वाक्षऱ्यांचे भाव दुसऱ्या स्वाक्षऱ्यांच्या हुंडणावळींतच ते ठरवितात. मौंट एव्हरेस्ट शिखरावर आरोहण करणारे शेर्पा तेनसिंग लंडनला गेले होते. त्यावेळीं त्यांनीं हजारों विद्यार्थ्यांच्या नोंदवह्यांत स्वतःच्या सह्या केल्या. शेर्पा तेनसिंग ह्यांची सही नेव्हिल ड्यूक ह्या प्रसिद्ध वैमानिकांच्या सहीच्या मोबदला मुलें एकमेकांना देतात–घेतात. शेर्पा तेनसिंगची सही हवी असेल तर ब्रिटिश परराष्ट्रमंत्री अँथनी ईडन ह्यांच्या तीन सह्या द्याव्या लागतात. नेव्हिल ड्यूक ह्यांच्या सहीची किंमतहि तितकीच आहे. शाळकरी मुलांनीं स्वाक्षऱ्यांचें चलनच चालू केलें आहे.

## नवचीनचा पंचवार्षिक कार्यक्रम

चीनमध्यें कम्युनिस्ट राजवट स्थापन झाल्यानंतर नवीन सरकारनें आर्थिक विकासाचा पंचवार्षिक कार्यक्रम आखून तो अंमलांत आणण्यास प्रारंभ केला. ह्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमापैकी पहिलें वर्ष आतां पूर्ण होत आलें आहे. प्रथम वर्षात मोठें भांडवल लागणाऱ्या १३० योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. १३० विकास–योजनांपैकी ५० योजना सो. रशिआच्या मदतीनें पूर्ण करण्यांत येत आहेत. चीनमधील खनिज संपत्ती-साधनांचा शोध लावण्याचें कामहि भूगर्भशास्त्रज्ञांनीं हातीं घेतलें होतें. ह्या तपासांत असें आढळून आलें कीं, चीनमध्यें तेल आणि तांबें बऱ्याच मोठ्या प्रमाणांत उपलब्ध होण्यासारखें आहे. ह्या दोन्ही खनिजांचें आधुनिक उद्योगधंद्यांच्या उभारणीच्या कामांत महत्त्वाचें स्थान आहे. चीन सरकारच्या अंदाजपत्रकापैकीं एक तृतीयांश रकम भांडवली खर्च म्हणून दाखविली गेली आहे. भांडवली खर्चाच्या साह्यानें चीनमध्यें ७५ मोठे कारखाने बांधण्यांत येत आहेत. नव्यानें बांधल्या जाणाऱ्या ह्या कारखान्यांत एक मोटारीचा कारखानाहि आहे. चीनमधील मोटारींचा कारखाना हा पहिलाच. त्याशिवाय बरेच एंजिनिअरिंग कारखाने, ९ रेल्वेचे रस्ते आणि ३०० मैल लांबीच्या नव्या सडकाहि प्रथम वर्षात बांधण्यांत येत आहेत. चीनमधील बहुतेक मोठे कारखाने सरकारी मालकीचे आहेत. आधुनिक उद्योगधंद्यांपैकी ६०. टक्के उद्योगधंदे सरकारचे आहेत हें खरें असलें, तरी खाजगी मालकीचे उद्योगधंदेहि विकास पावत आहेत. ह्या खाजगी उद्योगधंद्यांवर सरकारचें नियंत्रण मात्र आहे.

SAVE to help yourself and the NATION

WITH THE
HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum*

## धुळें अर्बन को. बँक लि.

१४६० सभासद, १,४०,८०० रु. शेअर भांडवल, ५,९०,२३७ रु. ठेवी, ५,८५,४५८ रु. कर्जें, १,२१,७२५ रु. रिझर्व्ह फंड, ८६,४७९ रु. इतर फंड, ५,०४४ रु. नफा, असे ह्या बँकेच्या गेल्या वर्षीच्या व्यवहाराचे प्रमुख आकडे आहेत. अहवालाचे सालीं भयंकर दुष्काळामुळें लोकांचा दैनंदिन चरितार्थ चालविणेंहि अशक्य झालें, त्यामुळें थकबाकी वाढली. ३¾% डिव्हिडंड देण्यांत आलें. १०½ लाखांच्या खेळत्या भांडवलांत बँकेचें स्वतःचें भांडवल २½ लक्ष रुपये आहे. ( चेअरमन : अहमद कमाल. मॅनेजर : ए. एस. देशपांडे )

## दि महाड को. अर्बन बँक लि.

अहवालाचे वर्षी बँकेचा एकूण व्यवहार ७६ लक्ष रुपयांचा झाला. कायम ठेवींची रकम वाढली आहे. निव्वळ नफा १४,३३५ रु. झाला आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमेचें प्रमाण पुष्कळच कमी झालेलें आहे. ५% डिव्हिडंड देण्यांत आलें. बँकेनें कर्जाऊ रकमा कमी देण्याचें धोरण स्वीकारल्यानें, गुदस्तापेक्षा एकूण कर्जे १ लाखांनीं कमी आहे. पुढील एक–दोन वर्षांत बँकेचीं २५ वर्षे पुरीं होणार आहेत, ह्या दृष्टीनें डायरेक्टरांचा प्रगतीची गति वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. ( चेअरमन: दत्तात्रय नरहर वैद्य, बी. ए., एलएल. बी. ऑ. मॅ. डायरेक्टर : दि. मो. मेहता, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : मा. गो. धारप, बी. एससी., एच. डी. सी. )

## दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेस अहवालाचे वर्षी २८,४५८ रु. नफा झाला. ६¼% डिव्हिडंड देण्यांत आलें. अहवालाचे वर्षी जिल्ह्यांत दुष्काळ होता, तरी कर्ज-वसुली समाधानकारक झालेली आहे. कर्जापोटीं गुंतवलेली रकम एकूण भांडवलाच्या शेंकडा २९.६ पेक्षा ज्यास्त नाहीं. सांगली येथील महाराष्ट्र अर्बन बँकांच्या परिषदेचे वेळीं अर्थमंत्री, डॉ. जिवराज मेहता, ह्यांनीं आदर्श अर्बन बँकांचा उल्लेख केला होता. त्यांत भुसावळ पीपल्स बँकेचा गौरवपर निर्देश होता. बँक मेडिकल वस्तूंचें खातें चालवीत आहे, त्याचा फायदा ज्यास्त सभासदांनीं घ्यावा, अशी डायरेक्टरांची विनंति आहे. बँकेच्या २५ लक्ष, ८९ हजार रु. खेळत्या भांडवलापैकी १,५०,०० रु. वसूल भांडवल व ९,३३,५८० रु. रिझर्व्ह व इतर फंडांचे आहेत. ( चेअरमन: हरि सदाशिव खरे. मॅनेजर : जिनाभाई जी. देसाई एफ्. आय्. एस्. ए.)

### द्विदल धान्याचें उत्पादन दोन लाख टनांनीं वाढलें

भारतांतील, हरभऱ्याव्यतिरिक्त १९५२–५३ मधील रब्बी हंगामांतील द्विदल धान्याचें एकूण उत्पादन १९४९–५० नंतरच्या कोठल्याहि वर्षापेक्षा जास्त असून १९५१–५२ पेक्षा तें २,३७,००० टनांनीं अधिक आहे.

१९५२–५३ मधील लागवडीचें क्षेत्र, तसेंच उत्पादन, मागील वर्षापेक्षा अधिक आहे. १९५१–५२ पेक्षा लागवडीच्या क्षेत्रांत ०·६ टक्क्यांची, तर उत्पादनांत २·९ टक्क्यांची वाढ झाली आहे.

याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणें आहे.—

| द्विदल-धान्याचा प्रकार | लागवडीचें क्षेत्र (हजार एकर) | | उत्पादन (हजार टन) | |
|---|---|---|---|---|
| | १९५२-५३ | १९५१-५२ | १९५२-५३ | १९५१-५२ |
| हरभरा | १७,२६७ | १६,८५७ | ३,७७१ | ३,२९३ |
| तूर | ५,८५२ | ६,०४५ | १,६०२ | १,८८१ |
| उडीद | २,९३० | ३,१३५ | ६०५ | ३६६ |
| मूग | २,५२० | २,६९७ | १८२ | २५४ |
| मठ | ४२७ | ४२५ | ३७ | ३८ |
| मसूर | १,०९९ | १,१०७ | १९१ | १८४ |
| कुळीथ | २,७११ | २,५३१ | १८६ | १८२ |
| वाटाणा | २,२४२ | २,३५२ | ६१२ | ६१८ |
| लाख | १,७७८ | १,७५९ | २४६ | २२१ |
| इतर | ९,८४३ | ९,४७१ | १,३५४ | १,२९२ |
| एकूण | ४६,६६९ | ४६,३७९ | ८,४८६ | ८,२४९ |

### दि कॉसमॉस को–ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें २

या बँकेच्या पदाधिकारी मंडळाची वार्षिक निवडणूक दि. २७ सप्टेंबर १९५३ रोजीं बिनविरोध होऊन खालीलप्रमाणें पदाधिकारी १९५३–५४ सालाकरितां निवडून आले आहेत.

१. सल्लागार मंडळ. १. मा. ग. न. जेजुरीकर., अध्यक्ष. २. मा. चिं. वा. भट, बी. ए., एलएल. बी., उपाध्यक्ष. ३. मा. गो. शं. देशमुख., डी. सी. ई., एल. एस. जी. डी., ४. मा. दा. मो. मोघे., ५. मा. शा. रं. साळवेकर, वा. वि. व व्या. वि. (टिळक)

२. कार्यकारी मंडळ. १ मा. वि. ना. दात्ये., बी. ए., कार्याध्यक्ष. २. मा. स. वा कुळकर्णी., बी. ए, एलएल. बी., उप कार्याध्यक्ष. ३. मा. प्रो. डॉ न. का. घारपुरे, एम्. ए., एलएल. बी., पीएच. डी. ४. मा. पां. रा. देव. ५. मा. मो. पां. देशपांडे. ६. मा. य. बा. देहाडराय., बी ए., बी. टी. ७. मा. ग. या. नातू, एम. ए. ८. मा. द. ल. पारखी, वकील. ९. मा. वा. म. लेले, १०. मा. वि. ल. हर्डीकर, जी. डी. कॉम. ११. मा. वा. रा. होनप, एम. ए., एलएल. बी,

३. स्थानिक आय-व्यय निरीक्षक. १. मा. देशपांडे. रा. कृ., बी. ए, बी. कॉम., बी. टी., २. मा. साठे. व. का., बी. ए., बी. कॉम.

### "चाणक्य-पुरी."

नव्या दिल्लींतील "डिप्लोमॅटिक एनक्लेव्ह" ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या विभागाचें नांव "चाणक्यपुरी" असें ठेवण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] … [ टेलिफोन नं. २४८१

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

अधिकृत भांडवल : ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें : २५,००,०००
वसूल भांडवल : १२,५०,०००

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर–चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव:—बँक १ ते ३ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५९ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.

**द. ऑस्ट्रेलियांतील अणुशक्तीचा प्रयोग**—द. ऑस्ट्रेलिआंत लवकरच ब्रिटनच्या नव्या अणुशस्त्रांची चांचणी वुमेरा या ठिकाणीं होणार आहे. ह्या चांचणीसाठी आसपासच्या ७०,००० चौरस मैलांच्या प्रदेशांत संचारबंदी जाहीर करण्यांत आली आहे. ता. १ ऑक्टोबरपासून प्रयोगांत भाग घेणाऱ्या विमानांशिवाय इतर विमानांना ह्या प्रदेशावर भ्रमण करतां येणार नाहीं.

**पंचवार्षिक योजनेचें स्वागत**—न्यूयॉर्क येथील जर्नल ऑफ कॉमर्स ह्या वृत्तपत्रानें भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाची आठपानी रूपरेषा छापून त्याचें स्वागत केलें आहे. भारताच्या आर्थिक कार्यक्रमाचें तिसरें वर्ष सुरू झालें असून गतकालांत भारतानें भरीव कार्य केलें आहे, असें एका स्वतंत्र लेखांत सांगण्यांत आलें आहे.

**हिमपर्वतांचा उपयोग**—उत्तर अटलांटिक महासागरांत तरंगणारे बर्फाचे पर्वत बोटींना धोका उत्पन्न करीत असल्यामुळें ते जितक्या लवकर वितळतील तितकें चांगलें, असें मानण्यांत येत असे. अमेरिकेनें आणि कॅनडानें ध्रुव-समुद्रांत जीं हवाई केंद्रें उभारलीं आहेत त्यांत काम करणाऱ्या लोकांना मात्र ह्या पर्वतापासूनच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो.

**मध्यप्रदेशांमधून तांदुळाची निर्यात**—मध्यप्रदेश सरकारनें तुटीच्या भागांत पाठविण्यासाठी आणखी १५,००० टन तांदूळ मुक्त केला आहे. आतांपर्यंत चालू वर्षांत राज्य-सरकारनें २,००,००० टन तांदूळ आणि ७०,००० टन ज्वारी निर्यात करण्यास परवानगी दिली आहे.

**निर्वासितांना धंदे-शिक्षण**—पूर्व पाकिस्तानमधून आलेल्या १,००० निर्वासितांना धंदे-शिक्षण देण्याची एक योजना भारतीय सरकारनें मंजूर केली आहे. योजना अंमलांत आणण्यासाठी ५ लाख रुपये खर्च येणार असून १२ धंद्यांचें शिक्षण देण्याची सोय करण्यांत येणार आहे. सर्वांत मोठें शिक्षण-केंद्र टिटाघर येथें उघडण्यांत येईल. तेथें ४०० निर्वासितांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यांत येईल

### उज्जैन-इंदूर ब्रॉडगेज रेल्वे लाइन

उज्जेन व इंदूर ह्यांस जोडणारी रेल्वेची ब्रॉडगेज लाइन येत्या तीन वर्षांत हातीं घेतली जाईल, असें रेल्वेमंत्री, श्री. लालबहादुर शास्त्री, ह्यांनीं ग्वाल्हेर येथें सांगितलें.

### नोकऱ्याविषयक परिस्थिति

ऑगस्ट, १९५३ मध्यें, भारतांतील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजेसकडे १,१४,२०८ बेकारांनीं नांवें नोंदविलीं व १३,११४ बेकारांना काम मिळालें.

### पुणें जिल्हा खरेदी-विक्री संघ लि.

वरील संस्थेच्या अध्यक्षपदीं श्री. भा. वि. फाटक ह्यांची निवड झाली आहे.

### बँक ऑफ टोकिओ

वरील बँकेची एक शाखा मुंबई येथें नोव्हेंबरमध्यें सुरू होईल. त्यासंबंधांत रिझर्व्ह बँकेशीं बोलणीं पुरीं झालीं आहेत. बँकेच्या कलकत्ता आणि कराची येथें शाखा चालू आहेत.

### कारखान्यांत चपला-बूट करण्यास बंदी करावी

मुंबई, सौराष्ट्र व कच्छ येथील, पादत्राणें बनविणाऱ्या चांभारांची एक परिषद् बडोदे येथें भरली होती. बूट, चपला, इत्यादींचें उत्पादन कायदा करून चांभारासाठी राखून ठेवण्यांत यावें, आणि कारखान्यांसाठी इतर कातडी माल राखून ठेवावा, असा परिषदेनें ठराव केला.

### कॉमनवेल्थ विमा कं. लि.

कॉमनवेल्थ विमा कंपनी लि. नें १९५२ मध्यें ४१,१५,७५० आयुर्विम्याचें काम पुरें केलें. वर्षअखेर लाइफ अॅशुअरन्स फंड १,१२,३८,९४८ रु. झाला. खर्चाचें प्रमाण (२५ व नियमाप्रमाणें) १५.२% पडलें.

कंपनीच्या आग विमा खात्याच्या हप्त्यांचें उत्पन्न १,६९,७२२ रु. झालें. अपघात व मिसलेनिअस विमा हप्त्यांचें उत्पन्न ४०,७०० रु. झालें. वरील दोन्ही खात्यांस अनुक्रमें ३५,०४६ रु. व १०,१५४ रु. नफा झाला.

भागदारांना ४% (वजा कर) डिव्हिडंड मिळणार आहे.

### जपानी पद्धतीच्या भातशेतीचा प्रसार

भात लागवडीच्या जपानी पद्धतीखाली चालू खरीप हंगामांत देशांत एकूण ३४.७२ लाख एकर जमीन असल्याचें मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याकडे आलेल्या प्राथमिक अहवालावरून समजतें. आतांपर्यंत १७ राज्यांकडून प्रत्येकी पांच एकरांपेक्षा कमी क्षेत्रांत भाताची अशी लागवड केलेल्या शेतकऱ्यांची व शेतांची संख्या समजली आहे. त्यानुसार अशा शेतकऱ्यांची संख्या ४६,३०० आहे.

### डी. डी. टी. चा कारखाना

भारतामधील डी. डी. टी. चा दुसरा कारखाना त्रावणकोर-कोचीन राज्यांत काढण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे, असें उत्पादनमंत्री श्री. के. सी. रेड्डी ह्यांनीं जाहिर केलें आहे. दिल्ली येथील डी. डी. टी. चा कारखाना लवकरच सुरू होईल, असेंहि त्यांनीं सांगितलें.


महाराष्ट्रीय कुटुंबाचीं

## तीन भूषणें

घरांतील माणसांच्या खाण्यापिण्यांतील आवडी-नावडी जशा विविध असतात, त्याचप्रमाणें त्यांच्या वाचनाची अभिरुचिहि निरनिराळी असते. कोणाला भारदस्त वाचन आवडतें, कोणाला संसारांत उपयुक्त होणारे तेवढेंच हवेसें वाटतें, मनोरंजक गोष्टी, चुटके कांहींना आवडतात, शास्त्रीय लेखांत कांहीं रंगून जातात, साहित्याच्या निरनिराळ्या प्रांतांत कांहींना गोडी वाटते, प्रवासवर्णनांत कांहीं रंगून जातात. स्त्री-पुरुषांच्या विविध आवडींना पोषक, बौद्धिक खाद्य पुरविणारीं, अंतर्बाह्य सुंदर आणि लोकप्रिय मासिकें म्हणजे—


**★ किर्लोस्कर ★ मनोहर ★ स्त्री**

किर्लोस्कर—१ तारखेस प्रसिद्ध. वा. वर्गणी ६ रु.
मनोहर— १० तारखेस प्रसिद्ध. वा. वर्गणी ४॥ रु.
स्त्री— १५ तारखेस प्रसिद्ध. वा. वर्गणी ५ रु.

—तिन्हीं एकत्र वार्षिक वर्गणी १५॥ रु.—

★ किर्लोस्कर प्रेसचीं १५ उद्बोधक प्रकाशनें
मे. केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २, यांच्या दुकानीं
मिळूं शकतील. यांदी मागवून त्यांतून निवड करा.


**किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी, द. सातारा**



मुंबई कावडें :—आश्चर्यकारक मजबूत व वापरण्यांस सोईस्कर. २।। पौंड, २।।। पौंड व ३ पौंड वजनाचे मिळतात.



चौरस तोंडाचे शोव्हेल :— उंची कार्बन पोलादापासून आय. एस. आय. च्या नमून्या बरहुकूम बनविलेले. व दणकट लाकडी मूठ बसविलेले.



पश्चिम भारत कावडें :—आश्चर्यकारक मजबूत असून वापरण्यांस सोईस्कर आहे. मजबूत बाजू टिकाऊपणाची हमी देतात.

# उत्पादक शेतीकरितां तुम्हीं ॲग्रिकोवर भरंवसा ठेवा




भारतांतील सहस्त्रावधि शेतांतून ॲग्रिको अवजारें आजकाल आश्चर्यकारक काम देत आहेत. उंची कार्बन पोलादापासून श्रेष्ठ दर्जाच्या शक्तिसाठीं कसोशीनें तपासणी करून बनविलेली ॲग्रिको अवजारें सर्व ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या पसंतीची आहेत.

## टाटा ॲग्रिको अवजारें

दी टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड
हेड सेल्स ऑफीस :–
२३ बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता-१.
शाखा :–
मुंबई, मद्रास, नागपुर, अहमदाबाद, सिकंदराबाद, विजयनगरम् कॅन्टोनमेंट, जलंदर कॅन्टोनमेंट व कानपुर.

AG. 3866

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.